# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**जा.क्र.:कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२०** **दि. २७ नोव्हेंबर,२०२०**

जळगाव दि.२७ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या २९ व्या दीक्षांत समारंभात ज्या विद्यार्थ्यांना पदवी/पदवीका प्रमाणपत्र घ्यावयाचे आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी दि.१५ डिसेंबर, २०२० पर्यंत मुतदवाढ करण्यात आली आहे.

विद्यापीठातर्फे ऑक्टोंबर,२०१९ व त्यापूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत आणि पी.एचडी. धारक अशा सर्व विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Home Page वरील Student Corner Examination Convocation वर उपलब्ध आहेत. त्यानुसार विनाविलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दि. १५ डिसेंबर,२०२० पर्यंत वाढविण्यात आली आहे. उत्तीर्ण वर्षापासून पाच वर्षाच्या आत पदवीप्रमाणपत्र शुल्क रूपये ३५०/- असून उत्तीर्ण वर्षापासून पाच वर्षा पेक्षा जास्त कालावधी झाला असल्यास रूपये १०००/- भरावे लागतील. पदवीप्रमाणपत्राचे शुल्क क्रेडिट कार्ड/डेबीट कार्ड/ नेट बँकिंग द्वारे ऑनलाईन भरावे असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक बी.पी.पाटील यांनी केले आहे.

तसेच माहे एप्रिल/मे २०२० च्या होणाऱ्या परीक्षामध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण होतील अशा विद्यार्थ्यांना Online पदवी / पदवीका प्रमाणपत्र अर्ज भरणेसाठी परीक्षेच्या निकालानंतर स्वतंत्र कालावधी जाहीर करण्यात येईल.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(प्रमोद आं.चव्हाण)
जनसंपर्क अधिकारी यांच्याकरिता